Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-XI Nov. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समस्या विमोचन क्षमतेचा त्यांच्या अभ्यास सवयीच्या संदर्भात अभ्यास

प्रा. डॉ. तुषार मधुकर माळी
(सहाय्यक प्राध्यापक)
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपूर जि. धुळे

सारांश-

प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समस्या विमोचन क्षमतेचा त्यांच्या अभ्याससवयीच्या संदर्भात अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मकसंशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला असून १५० विद्यार्थ्यांची सहेतुक नमुना निवड पद्धतीने न्यादर्श निवडला होता. विद्यार्थ्यांची समस्या विमोचन क्षमता मापन करण्यासाठी एल. एन. दुबे यांची प्रमाणित समस्या विमोचन क्षमता चाचणीचा (Problem Solving Ability Test), तसेच अभ्यास सवयी मापन करण्यासाठी डॉ. टी. प्रदीपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिकेचा (Study Habits Scale (SHS)) अवलंब केला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन, 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब केला. प्रस्तुत संशोधनातून अनुकूल अभ्यास सवयी असलेल्या विद्यार्थ्यांची समस्या विमोचन क्षमता ही प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसून येते.

Keyword (सूचनक शब्द): *समस्या विमोचन क्षमता, अभ्यास सवयी आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी*

प्रस्तावना-

समस्या विमोचन क्षमता ही विद्यार्थ्यांच्या अभ्यासात प्रमुख भूमिका बजावत असते. त्याचबरोबर ही क्षमता विद्यार्थ्याला आयुष्यभर मदत करीत असते. जीवनाच्या चढउतारात अनेक समस्या येत असतात, ते सोडविण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये असणे महत्त्वाचे असते. शालेय जीवनात ही बाब विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाशी जोडलेली असते. गणितातील विविध उदाहरणे ती सोडवितांना विद्यार्थ्यांकडून होणोर प्रयत्न, चित्रकला, किंवा मग विज्ञानातील उदाहरणे ही सर्व बाब विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देत असतात. विद्यार्थ्यासमोर अभ्यासक्रमाच्या रूपाने मांडलेल्या विविध समस्या तो कसा सोडवितो यावरूनच विद्यार्थ्यांची क्षमता ओळखली जात असते. समस्या समोर आल्यावर तो तीची मांडणी कशी करतो, तात्पुरते उत्तरे कशी ठरवितो, नियोजन किंवा ती समस्या सोडविण्यासाठी तयारी कशी करतो या सर्व गोष्टींवरच त्याच्या समस्या विमोचन क्षमतेची यशस्वीता अवंलुबन असते.

अभ्यास सवयी ही एक अतिशय महत्त्वाची बाब विद्यार्थ्यांच्या बाबतीत विचार करण्यासारखी असते. वर्गातील अध्ययन अध्यापन प्रक्रियेनंतर विद्यार्थी आपला अभ्यास कसा करतो यावरच त्याचे यश अवलंबुन असते. काही विद्यार्थी अभ्यास करतांना वातावरण, प्रकाश, शांतता आणि नोटस् किंवा उपयोगी पडणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार करीत असतात, तर काही विद्यार्थी केवळ वाचणावर भर देत असतात. अभ्यास करण्याच्या सवयी या अनुकूल असल्या तर विद्यार्थ्यांना यश संपादन करण्यात वेळ लागत नाही. परंतु केवळ अभ्यास होत आहे आणि तो आकलन स्तरांवर होत

नसेल तर विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या वेळी गोंधळ निर्माण होतो तो म्हणजे केवळ प्रश्नाचे स्वरूप बदलले तरी गोंधळ निर्माण होतात आणि परीक्षेत विद्यार्थी नापास होत असतात. म्हणूनच अभ्यास सवयीही महत्त्वाच्या आहेत. अभ्यास सवयी विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमता वाढवित असतात. आकलन क्षमता वाढली की, विद्यार्थ्यांना समोर येणाऱ्या समस्या सोडवितांना या आकलनशक्तीचा उपयोग होत असतो. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेचा त्यांच्या अभ्याससवयी संदर्भात अभ्यास केला आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा- Kalaimathi, Hemalatha (2015) यांना आपल्या संशोधनात, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या समस्या विमोचन क्षमता आणि सक्रिय स्मृती यांच्या धनात्मक सहसंबंध आढळून आला. **B. Anboucarassy (2015)** यांना आपल्या संशोधनात, उच्चमाध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये समस्या विमोचन क्षमता साधारण दिसून आली तसेच अध्ययन आणि समस्या विमोचन क्षमता यात धन सहसंबंध दिसून आला. **Marcus & Nathan (2008)** विदयार्थ्यांची अभ्यास सवयी आणि अभिवृत्तीचा अभ्यास केला असून त्यात त्यांना अभ्यास सवयीचे कौशल्य संपादणूकी वाढविण्यास मदत करते. **Susan Bahrami, (2011)** यांनी विदयार्थ्याची अभ्यास सवयी, उत्साह आणि अवसाद यांचा सहसंबंधाचा अभ्यास केला आहे. त्यात त्यांना अभ्यास सवयी, उत्साह व अवसाद यांच्या ऋणात्मक सहसंबंध दिसून आला.

समस्या विधान-

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेचा त्यांच्या अभ्यास सवयीच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास करणे.

उद्दिष्टे

१. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयीचा अभ्यास करणे.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल, प्रतिकुल आणि तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या समस्या विमोच क्षमतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

परिकल्पना

१. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.
३. कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

पद्धती-

प्रस्तुत संशोधनात संशोधकाला शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समस्या विमोचन क्षमतेचा त्यांच्या अभ्यास सवयीच्या संदर्भात सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.

जनसंख्या- प्रस्तुत संशोधनासाठी शिरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील अकरावीला वर्षातील सर्व विद्यार्थ्यांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती.

न्यादर्श- प्रस्तुत संशोधनासाठी सहेतूक नमुना निवड पद्धतीने कला शाखेतील ५० विद्यार्थी, विज्ञान शाखेतील ५० विद्यार्थी व वाणिज्य शाखेतील ५० विद्यार्थी असे एकूण १५० विद्यार्थ्यांची संशोधनासाठी निवड केली होती.

संशोधनाची साधने- प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांची समस्या विमोचन क्षमता मापन करण्यासाठी एल. एन. दुबे यांची प्रमाणित समस्या विमोचन क्षमता चाचणी (Problem Solving Ability Test) चा अवलंब केला होता. या चाचणीत एकूण २० समस्या दिल्या आहेत. बरोबर उत्तर देणाऱ्या ०१ गुण आणि चुकीचे उत्तर देणाऱ्या शून्य गुण अशी गुणदानाची पद्धती होती. अभ्याससवयीचा अभ्यास करण्यासाठी डॉ. टी. प्रदीपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिकेचा (Study Habits Scale (SHS)) अवलंब केला होता. प्रस्तुत मापिकेत एकूण ३० विधाने होते. २४ होकारात्मक व ०६ नकारात्मक विधाने होती

संख्याशास्त्रीय परिमाणे- प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन, 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन- प्रस्तुत संशोधन पेपरांत प्रथम कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना डॉ. टी. प्रदीपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिका देण्यात आली. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून खालील प्रमाणे विश्लेषण करण्यात आले.

तक्ता क्र. ०१ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अभ्याससवयी

अभ्यास सवयी	विद्यार्थी
अनुकूल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी	७४ (४९%)
प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी	४३ (२९%)
तटस्थ अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी	३३ (२२%)



निरीक्षण: कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेले विद्यार्थी हे ४९ टक्के, प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले २९ टक्के तर तटस्थ अभ्यास सवयी असलेले २२ टक्के विद्यार्थी दिसून येतात.

परिकल्पना परीक्षण

१. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

समस्या विमोचन क्षमता	अनुकूल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी	प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी
संख्या	७४	४३
मध्यमान	१२.५६	१०.२१
प्रमाणविचलन	३.९७	२.९९
प्रमाणत्रुटी	०.४२	
नमुना 't' मूल्य	१.९८	
प्राप्त 't' मूल्य	३.६२	
सार्थ	सार्थ	
त्याग /स्वीकार	त्याग	



df = ११५ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९८ आहे व प्राप्त 't' मूल्य ३.६२ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेल्या विदयार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचे मध्यमान (१२.५६) हे प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमानापेक्षा (१०.२१) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्यासवयी असलेल्या विद्यार्थ्यांची समस्या विमोचन क्षमता प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसून येते.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व तटस्थ्य अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

समस्या विमोचन क्षमता	अनुकूल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी	तटस्थ्य अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी
संख्या	७४	३३
मध्यमान	१२.५६	१०.९९
प्रमाणविचलन	३.९७	३.०१
प्रमाणत्रुटी	०.४८	
नमुना 't' मूल्य	१.९८	
प्राप्त 't' मूल्य	२.२४	
सार्थ	सार्थ	
त्याग /स्वीकार	त्याग	



df = १०५ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९८ आहे व प्राप्त 't' मूल्य २.२४ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व तटस्थ्य अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेल्या विदयार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचे मध्यमान (१२.५६) हे तटस्थ्य अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमानापेक्षा (१०.९९) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्यासवयी असलेल्या विद्यार्थ्यांची समस्या विमोचन क्षमता तटस्थ्य अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसून येते.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ्य अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

समस्या विमोचन क्षमता	प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी	तटस्थ्य अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी
संख्या	४३	३३
मध्यमान	१०.२१	१०.९९
प्रमाणविचलन	२.९९	३.०१
प्रमाणत्रुटी	०.४८	
नमुना 't' मूल्य	२.००	
प्राप्त 't' मूल्य	१.१२	
सार्थ	सार्थ	
त्याग /स्वीकार	त्याग	



df = ७४ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य १.१२ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ्य अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. दोन्ही गटातील मध्यमान गुणाकांत आलेला फरक हा योगायोगाने आलेला असेल असे म्हणावे लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ्य अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांची समस्या विमोचन क्षमता सारखीच दिसून येते.

निष्कर्ष

१. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेले विद्यार्थी हे ४९ टक्के, प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले २९ टक्के तर तटस्थ अभ्यास सवयी असलेले २२ टक्के विद्यार्थी दिसून येतात.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येतो.
३. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येतो.

४. कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमतेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

चर्चा-

वरील निष्कर्ष पाहता हे लक्षात येते की, अभ्यास सवयींवर समस्या विमोचन क्षमता अवलंबुन आहे असे दिसून येते. अनुकूल अभ्यास सवयी असलेल्य विद्यार्थ्यांची समस्या विमोचन क्षमता ही प्रतिकुल आणि तटस्थ्य अभ्यास सवयी असलेल्या विद्यार्थ्यापेक्षा अधिक दिसून येते. म्हणूनच केवळ शाळेत जाणे, अभ्यासक्रमाची काठिण्य, घराचे वातावरण, प्रभावी अध्यापन होणे किंवा शालेय वातावरण सक्षम राहणे म्हणजे विद्यार्थंचा शैक्षणिक विकास साधता येईल तर विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी हया अनुकूल राहिल्या तर अध्ययन गतीशील होत असते आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचा समस्या विमोचन क्षमता वाढत जातात.

संदर्भसूची

1) Aggarwal J.C. (1991). *Educational & Vocational Guidance & Counselling*. New Delhi: Doaba House.
2) B. Anboucarassy. (2015). Problem solving ability of higher secondary students in relation to their learning styles. (*International Journal of Applied Research,* 2015; 1(7): ISSN Online: 2394-5869, 127-131. www.allresearchjournal.com)
3) Chauhan, S.S. (1999). *Advanced Educational Psychology*. Vikas Publishing House, New Delhi.
4) Garrett, H. E (1985). *Statistics in Psychology and Education*. Bombay Vakils, Feiffer and Simons Ltd.
5) Kalaimathi, Hemalatha. (2015). A Study on the relationship between Problem Solving Ability and Working memory of Secondary School Students. (*PARIPEX- INDIAN JOURNAL OF RESEARCH* Vol.4, Issue: 8, Aug 2015, ISSN - 2250-1991. Pg. 379 to 381)
6) Marcus & Nathan (2008) Study Habits, Skills, and Attitudes. (*Perspectives on Psychological Science*, Volume 3. Number 6 mcrede@albany.edu.)
7) Susan Bahrami, The relationship between students study habits, happiness and depression. (Iran J Nurs Midw ifery Res. 2011 summer; 16 (3): 217-221. http://www. ncbi.nlm.nih.gov/pmc/ articles/PMC 3249802/)
८) कदम चा.प. (१९९७). *शैक्षणिक संख्याशास्त्र.* पुणे : श्री विद्या प्रकाशन.
९) भिंताडे वि. रा. (१९८९). *शैक्षणिक संशोधन पध्दती (प्रथम आवृत्ती).* पुणे: नुतन प्रकाशन.
१०) जोशी बी. आर. (२००७). *सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिध्दांताचा कोश (मानसशास्त्र).* पुणे: डायमंड पब्लिकेशन्स
११) दुनाखे, अरविंद (२००५). *शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन*. पुणे: नित्य नुतन प्रकाशन.
१२) घोरमोडे, यु. के. आणि घोरमोडे, कला (२०१०). *शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन*. नागपुर: विद्या प्रकाशन.
१३) मुळे, आणि उमाठे वि.तु. (१९८७). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे.* नागपुर: महाराष्ट्र साहित्य निर्मीती मंडळ.
१४) पंडित, ब. बि. आणि मोरे, लता. (२०१०). *शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग*. नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.
१५) पंडीत, ब.बी. (२००५). *शिक्षणातील संशोधन*. पुणे: नित्य नुतन प्रकाशन.